1

क्र•मुंमप्रविप्रा/बैठक/९१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१•

दिनांक : १२ जून, १९८६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २२ मे, १९८६ रोजी झालेल्या एकेचाळीसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे•

सन्माननीय सदस्यानी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती•

श्र वि आसगांवकर
१२/६/८६

[श्र•वि•आसगांवकर]
सचिव
कार्यकारी समिती

प्रति,

सर्व सदस्य
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

No.BMRDA/MTG/41.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 12th June, 1986.

The minutes of the 41st meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 22nd May, 1986 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

Sd/- 12/6/86.
(S. V. ASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

The Officers ot the B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-

ukd:

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या एकेचाळीसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २२ मे, १९८६ (गुरुवार)

वेळ : सकाळी ११.३० वाजता

सभास्थान : समिती कक्ष, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्ही. सुब्रह्मण्यन्<br>नगर विकास व गृहनिर्माण मंत्री | -- | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णू सावंत<br>नगर विकास राज्यमंत्री | -- | सदस्य |
| श्री. चंद्रकांत पडवळ<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. रमणलाल छोटालाल अंकलेश्वरिया<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि. पटेल,<br>नगरसेविका, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्या |
| श्री. भगवंतराव अण्णासाहेब पाटील,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू<br>विधानसभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री. पांडुरंग शिवराम देशमुख<br>विधान परिषद सदस्य | -- | सदस्य |
| श्री. जे. जी. कांगा,<br>महापालिका आयुक्त,<br>मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. दिनेशकुमार जैन,<br>शासनाचे सचिव,<br>नगर विकास विभाग | -- | सदस्य |
| श्री. दिनेश अफझुलपूरकर,<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | -- | सदस्य |
| श्री. एस. आर. काकोडकर,<br>महानगर आयुक्त | -- | सदस्य-सचिव |

बाब क्र. १ : मागील (४०व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

मागील बैठकीचे कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

..2/-

बाब क्र.२ : मागील (४०व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

वरील बाब-टिप्पणीवर चर्चा होऊन प्राधिकरणाने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ई' विभागातील व्यापारी भू-खंड क्र.सी-१८ ते सी-२२ यांचे नियत वाटप

प्राधिकरणाने दि.२७मार्च,१९८६ रोजी झालेल्या आपल्या (४०व्या) बैठकीत उपरोक्त विषयानुलक्षाने काही ठराविक मुद्दयांवर अधिक माहिती मिळावी अशी इच्छा प्रकट केली होती.सदर माहिती समाविष्ट असलेल्या पूरक टिप्पणीसकट प्राधिकरणाने आजच्या बैठकीत उपरोक्त विषयाच्या बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला.

२. मूळ बाब-टिप्पणी व पूरक टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ई' विभागातील क्र.सी-१८ ते सी-२२ हे भू-खंड पुढील अर्जदार संघटनांना नियत वाटपाने देण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली :

| अनु.क्र. | भू-खंड क्र. | अनुज्ञेय बांधणी क्षेत्र (चौ.मीटर) | भू-खंडाचे नियत वाटप ज्या प्रस्तावित आहे त्या अर्जदार संघटनेचे नाव |
|---|---|---|---|
| १. | सी-१८ | ४४२५ | कॉम्प्युटर मेन्टेनन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया |
| २. | सी-१९ | ५०६० | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित |
| ३. | सी-२० | ४८४० | कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन |
| ४. | सी-२१ | ४४२५ | महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ |
| ५. | सी-२२ | ४४२५ | मिनरल ॲन्ड मेटल ट्रेडिंग कॉर्पोरेशन (एमएमटीसी) |

३. भू-खंडाचा अधिमूल्य दर प्रति चटईक्षेत्र निर्देशांक चौरस मीटरला रु.४५५०/- इतका ठेवण्याचा आधीचा प्रस्ताव होता.तथापि जमिनीच्या किंमतीत झालेली वाढ विचारात घेऊन सदर दर प्रति चटईक्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.५०००/-इतका निश्चित करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला.

४. या भू-खंडाचे काही टक्के परिबध्द क्षेत्र शासनाला प्रत्यर्पित करण्याच्या प्रश्नावरही प्रदीर्घ विचारविमर्श झाला आणि शेवटी असे ठरले की, ज्या संघटनांना वरील भू-खंडाचे नियत वाटप केले जाईल त्यांनी,परिबध्द जागा ही त्यांच्या गरजेहून जादा असल्यास तिच्या एक-दशांश इतके क्षेत्र योग्य बाजार-भाडयाने राज्य शासनाला द्यावे लागेल तद्नुरुप अर्जदारांशी (allottees ) करावयाच्या भाडेपट्टा करारनाम्यात योग्य अट अंतर्भूत केली जावी असा निर्णय प्राधिकरणाने घेतला.

५. कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांना ज्या नियम व अटींवर भू-खंड देऊ केलेला आहे तो भू-खंड त्यांनी स्वीकारला नाही तर त्याच नियम व अटींवर सदर भू खंडाचे कंपनी लॉ-बोर्ड, भारत सरकार यांना नियत वाटप करण्यात यावे असेही बैठकीत ठरले.

६. त्यानुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३०९ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उप-कलम (२) खाली प्रदान असलेल्या आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तिंचा अवलंब करुन हे प्राधिकरण वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ई' विभागातील क्र.सी-१८ ते सी-२२ या व्यापारी भू-खंडाचे पुढील संघटनांना प्रति चटईक्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.५०००/-या अधिमूल्य दराने नियत वाटप करण्यास याद्वारे आपली मान्यता देत आहे :-

| अनु.क्र. | भू-खंड क्र. | अनुज्ञेय बांधणी क्षेत्र (चौ.मी.) | भू-खंडाचे ज्यांना नियत वाटप झाले त्या अर्जदार संघटना |
|---|---|---|---|
| १. | सी-१८ | ४४२५ | कॉम्प्यूटर मेन्टेनन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया. |
| २. | सी-१९ | ५०३० | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित. |
| ३. | सी-२० | ४८४० | कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन. |
| ४. | सी-२१ | ४४२५ | महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ |
| ५. | सी-२२ | ४४२५ | मिनरल ॲन्ड मेटल ट्रेडिंग कॉर्पोरेशन (एमएमटीसी) |

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, ज्या संघटनांना भू-खंडाचे नियत वाटप केले जाईल त्यांनी, परिबध्द जागा ही त्यांच्या गरजेहून जादा असल्यास तिच्या एक-दशांश इतके क्षेत्र योग्य बाजार-भाड्याने राज्य शासनाला द्यावे लागेल, अशी अट भाडेपट्टा करारनाम्यात अंतर्भूत करण्यात यावी.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांना ज्या नियम व अटींवर भू-खंड देऊ केलेला आहे तो भू-खंड त्यांनी जर स्विकारला नाही तर त्याच नियम व अटींवर सदर भू-खंडाचे कंपनी लॉ-बोर्ड, भारत सरकार यांना नियत वाटप करण्यात यावे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, अर्जदाराशी निष्पादित करावयाचा भाडेपट्टा करारनामा आणि भाडेपट्टा विलेख यांच्या उचित प्र-नमुन्यात आवश्यकतेनुरुप/ दुरुस्ती करण्याकरिता महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, या प्रस्तावाची कार्यवाही करण्याकरिता महानगर आयुक्तांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.४ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कल्याणच्या विकास आराखडयात किरकोळ फेरफार : साईट क्र.५२

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३१० :

"ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४०(१)(क)च्या तरतुदीन्वये दि.१५ मार्च, १९७८ च्या शासन निर्णय क्र.टीपीबी/१२७५/११९१/युडी-८ नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाली आहे आणि ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ११३(८) च्या तरतुदीनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्ये पार पाडणे बंधनकारक आहे.

"आणि ज्याअर्थी, पूर्वीचे कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ नगर परिषदांचे क्षेत्र व उल्हासनगरच्या नगरपालिका हद्दी विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारकक्षेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

"आणि ज्याअर्थी, शासनाने दि.१६.१.१९८० च्या शासकीय अधिसूचना क्र.टीपीएम-१२७९/३२३५(बी)/युडी५ अन्वये कल्याणच्या विकास आराखडयास मंजुरी दिली आहे.

"आणि ज्याअर्थी" महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ च्या तरतुदीन्वये श्री.ए.व्ही.जोशी यांच्या मालकीच्या सीटीएस क्र.२५१५ (पैकी) आणि २५१६ (पैकी) ह्या कल्याण येथील जमिनी 'मोकळया जागेच्या' आरक्षणातून वगळता येतील अशा त-हेने आरक्षण क्र.५२च्या संबंधात कल्याणच्या मंजूर विकास योजनेत फेरबदल करण्यास महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास निदेशीत केले आहे.

"<u>अता म्हणुन,</u> महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मध्ये सूचित केल्याप्रमाणे आरक्षण ५२ च्या बाबतीत हे महानगर प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ११३(८) मध्ये अंतर्भूत असलेल्याअधिकाराचा वापर करुन कल्याणच्या मंजूर विकास योजनेमध्ये किरकोळ फेरफार करण्याचा आपला इरादा याव्दारे जाहीर करीत आहे :-

"<u>त्यापुढे असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,</u> उक्त अधिनियमाचे कलम ३७ अंतर्गत अधिकार व त्याबाबत सहाय्यभूत असलेले इतर अधिकार वापरुन हे प्राधिकरण अशा फेरफाराबाबत, सूचनेच्या तारखेपासून एक महिन्याहून अधिक नाही इतक्या अवधीत जनतेकडून हरकती व सूचना मागविणारी सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात आणि दोनहून कमी नाही इतक्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यास मान्यता देत आहे.

"<u>त्यापुढे असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,</u> उक्त अधिनियमाचे कलम १३९ व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ७(अ) अंतर्गत आपले अधिकार वापरुन उपरिनिर्दिष्ट उपवाक्यानुसार सूचना प्रसिध्द करण्यास प्राधिकरण महानगर आयुक्तास प्राधिकृत करीत आहे;

"<u>त्यापुढे असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,</u> उक्त अधिनियमाचे कलम १५१(३) अंतर्गत अधिकाराचा वापर करुन हे प्राधिकरण महानगर आयुक्तास असे निदेशित करीत आहे की ते नियोजित फेरफाराबद्दल हरकती/सूचना देणाऱ्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेऊन ह्याबाबत प्राप्त झालेल्या हरकतींवर/सूचनांवर विचार करतील व प्रस्तावित फेरफारांसह उक्त अधिनियमाचे कलम ३७ च्या संदर्भात अंतिम मंजुरीसाठी आपला अहवाल राज्य शासनास सादर करतील."

<u>बाब क्र.५ :</u> बॅक-बे रिक्लेमेशन क्षेत्राच्या ब्लॉक ३ ते ६ मधील भागासाठी <u>विकास आराखडयाचा कच्चा मसुदा तयार करण्याचा हेतू जाहीर करणे</u>

प्राधिकरणाने वरील विषयाच्या बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.३११ :</u>

"<u>असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,</u> विकास आराखडयाचा एक अविभाज्य भाग असणाऱ्या 'बॅक-बे सौंदर्यीकरण योजनेचा समावेश असलेल्या, विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकार कक्षेतील संपूर्ण क्षेत्रासाठी विकास आराखडा तयार करावयाचा असल्यामुळे, अधिसूचनेतील बॅक-बे सौंदर्यीकरण योजने-चा उल्लेख वगळता यावा म्हणून, दिनांक ११.३.१९८६ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र, कोकण विभाग पुरवणी (असाधारण) याचे पृष्ठ ५० वर प्रसिध्द झालेल्या दि.११.३.१९८५च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिसूचनेला क्र.टीसीपी(पी-१)/डीपी-एसपीए(बीबीआरएस)२९८ ला उचित शुध्दीपत्र काढण्यात यावे.

..६/-

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ व तदन्तर्गत नियम यान्वये आवश्यक असल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन राजपत्र व वृत्तपत्रे यामध्ये उक्त शुध्दीपत्र प्रसिध्द करण्याचे अधिकार यव्दारे महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

बाब क्र.६ : कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञाची दोन पदे निर्माण करणे

प्राधिकरणाने वरील विषयाच्या बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३१२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे पोट कलम (२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन हे प्राधिकरण, कार्यसूची-टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे रु.६००-११५० अधिक नेहमीचे भत्ते ह्या वेतनश्रेणीत कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञाची दोन पदे निर्माण करण्यास यव्दारे आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.७ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणात 'पणन शाखा' निर्माण करणे

वरील विषयाची बाब-टिप्पणी चर्चेस आली त्यावेळी महानगर आयुक्तांनी असे स्पष्टीकरण केले की, बाब टिप्पणीत 'सहायक पणन व्यवस्थापक' या पदासाठी रु.६८०-१२५० ही वेतनश्रेणी प्रस्तावित केलेली आहे. वस्तुत: सदर पदाच्या वेतनश्रेणीतील एकरुपतेसाठी ती वेतनश्रेणी रु.६००-११५० अशी असावी लागेल. महानगर आयुक्तांच्या या सूचनेशी प्राधिकरणाने सहमत दर्शविले आणि सूचनेवर आधारीत फेरफारासह पणन शाखा निर्मितीच्या प्रस्तावाला मंजूरी दिली. त्यानुसार पुढील ठराव मंजूर करण्यात आला :

ठराव क्र.३१३ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ११ चे पोटकलम (२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा व त्याबाबत त्याला सहाय्यभूत असलेल्या इतर सर्व शक्तीचा वापर करुन हे प्राधिकरण खालील गोष्टींस यव्दारे आपली मंजूरी देत आहे :

(१) प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रकल्प अधिकारी (पणन) ह्या पदाचे नाव 'पणन व्यवस्थापक' असे करुन ते पद दीर्घ मुदतीकरिता चालू ठेवणे.

आणि

..७/-

(२) रु.६००-११५० अधिक नेहमीचे भत्ते या वेतनश्रेणीत सहायक पणन व्यवस्थापकांची २ पदे दीर्घ मुदतीकरिता निर्माण करणे."

बाब क्र.८ : 'महानगर विकास प्राधिकरण संघा'ला (ॲमडा) इमारत बांधणी-प्रित्यर्थ जमीन-खरेदीकरिता रु.१ लाख इतके अंशदान प्रदान करण्याबाबत

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३१५ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, अध्यक्ष, महानगर विकास प्राधिकरण संघ यांनी केलेली विनंती योग्य प्रकारे विचारात घेतल्यानंतर, महानगर विकास प्राधिकरण संघाला (ॲमडा) नवी दिल्लीत स्वतःची इमारत बांधण्याकरिता भू-खंड खरेदी करण्याप्रीत्यर्थ रु.१ लाख इतके अंशदान करण्याच्या प्रस्तावास हे प्राधिकरण याव्दारे आपली मान्यता देत आहे. त्यासाठी लागणारा निधी प्राधिकरणाच्या १९८६-८७ या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजामधील अपेक्षित बचतीमधून भागविण्यात यावा.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की सदर रु.१ लाख इतकी रक्कम महानगर विकास प्राधिकरण संघास अदा करण्यासाठी महानगर आयुक्तांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

अध्यक्षांच्या परवानगीने विचारार्थ आलेली बाब :

श्रीमती इंदुमती पटेल यांनी असे निवेदन केले की, मुस्लीम दफनभूमीच्या प्रयोजनासाठी मुंबई महानगरपालिकेने ओशिवरे येथे ५ एकर जमीन राखून ठेवली आहे. त्यानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर जमीन संपादन करुन तिचा ताबाही घेतलेला आहे. त्यानंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संकल्पित ओशिवरे जिल्हा केंद्रात उभारल्या जाणाऱ्या मध्यवर्ती वाणिज्य विभागाच्या जमिनीवर सध्या जी बांधकामे दिसून येतात त्यांच्या पुनर्वसनार्थ वरील दफनभूमीपैकी ($3\frac{1}{2}$) साडेतीन एकर जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव आणलेला आहे. श्रीमती पटेल यांनी पुढे सांगितले की, मुस्लीम दफनभूमीसाठी जमीन मिळावी ही फार जुनी मागणी असून मुंबई महानगरपालिकेने संपादन केलेल्या एकूण जमिनीची दफनभूमीसाठी गरज भासणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर जमीन ताब्यात घेऊ नये अशी त्यांनी सूचना केली. त्यावर मुंबई महानगरपालिकेशी विचारविनिमय करुन सदर बाब पडताळून पहाण्याचे महानगर आयुक्तांनी मान्य केले.

अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज त्यानंतर समाप्त झाले.

-------

1)

**MINUTES OF THE FORTY-FIRST MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY**

DATE : 22nd May, 1986 (Thursday).

TIME : 11.30 A.M.

PLACE : Committee Room, 5th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Dr. V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - Chairman |
| Shri Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Chandrakant Padwal, Chairman, Standing Committee, B.M.C. | - Member |
| Shri R.C. Ankleshwaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri Pandurang S. Deshmukh, M.L.C. | - Member |
| Shri J.G. Kanga, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri D.K. Afzulpurkar, Secretary to Government, Housing and Special Assistance Department. | - Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary. |

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (40th) Meeting.

The minutes were confirmed.

Item No.2 : Action taken on the minutes of the last (40th) Meeting.

After discussion, the action taken report was noted by the Authority.

Item No.3 : .....

**Item No.3 :** Disposal of commercial plots Nos.C-18 to C-22 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.

The Authority considered the Item Note including the supplementary note giving information on specific points which was sought by the Authority in its 40th meeting held on 27th March, 1986.

2. After detailed discussion on the item and considering the additional information furnished in the supplementary note, the Authority approved the proposal to allot plots Nos.C-18 to C-22 in 'E' Block of Bandra-Kurla Complex to the following Organisations :-

| Sr. No. | Plot No. | Permissible built-up area in sq. mtrs. | Name of the Organisation to whom the plot is to be allotted. |
|---|---|---|---|
| 1. | C-18 | 4425 | Computer Maintenance Corporation of India. |
| 2. | C-19 | 5060 | Maharashtra State Co-operative Bank Limited. |
| 3. | C-20 | 4840 | Commissioner of Labour, Government of Maharashtra. |
| 4. | C-21 | 4425 | Maharashtra State Co-operative Marketing Federation. |
| 5. | C-22 | 4425 | Minerals and Metal Trading Corporation (MMTC). |

3. As regards the price, the Authority decided that the price should be Rs.5,000/- per FSI sq. metre, instead of Rs.4,550/- per FSI sq. metre in view of the fact that there has been an escalation in land prices since the rate of Rs.4,550/- per FSI sq. metre was originally proposed.

4. The question of surrendering a certain percentage of the built-up area on these plots to the Government was considered by the Authority at length and it was finally decided that the Organisations to whom the above plots were being allotted should be required to give to Government 1/10th of the built-up space if it is surplus to their own requirements at a reasonable market rent. It was decided that a condition to that effect should be incorporated in the Lease Agreement with the Allottees.

It .....

5. It was further decided that in the event of the Labour Commissioner not accepting the plot offered to him on the terms and conditions on which it is offered it shall be offered to the Company Law Board, Government of India, on the same terms and conditions.

6. The following Resolution was accordingly passed :-

RESOLUTION NO.309 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling in this behalf, the Authority hereby approves the proposal to allot Plots Nos.C-18 to C-22 in 'E' Block of Bandra-Kurla Complex to the following organisations at the rate of Rs.5,000/- per FSI sq. metre :-

| Sr. No. | Plot No. | Permissible built-up area in sq. metre. | Name of the Organisation to whom the plot is allotted. |
|---|---|---|---|
| 1. | C-18 | 4425 | Computer Maintenance Corporation of India. |
| 2. | C-19 | 5060 | Maharashtra State Co-operative Bank Limited. |
| 3. | C-20 | 4840 | Commissioner of Labour, Government of Maharashtra. |
| 4. | C-21 | 4425 | Maharashtra State Co-operative Marketing Federation. |
| 5. | C-22 | 4425 | Minerals and Metal Trading Corporation (MMTC). |

"Resolved further that a condition shall be incorporated in the Lease Agreement that the allottees shall give to the State Government 1/10th of the built-up space on the plots allotted to them if it is surplus to their requirements, at a reasonable market rent.

"Resolved further that in case the Commissioner of Labour, Government of Maharashtra, does not accept the plot offered to him on the terms and conditions on which the plot is offered, the same shall be offered to the Company Law Board, Government of India, on the same terms and conditions on which it is offered.

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA, is hereby authorised to make suitable amendments

if....

if necessary in the form of Agreement to Lease and Lease Deed to be executed with the Allottees.

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA, is hereby authorised to take further necessary action to implement this Resolution."

Item No.4 : Minor modification to the Development Plan of Kalyan under M.R.& T.P.Act, 1966 - Site No.52.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.310 :

"Whereas BMRDA is appointed Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as per Government Resolution No.TPB/1275/1191/UD-8, dated 15th March, 1976, under the provisions of Section 40(1)(c) of MR&TP Act, 1966 and whereas it is obligatory on BMRDA to perform the functions of Planning Authority under the provisions of Section 113(8) of MR&TP Act, 1966;

"And whereas the area of erstwhile Municipal Councils for Kalyan, Dombivali, Ambernath and municipal limits of Ulhasnagar are included within the jurisdiction of Special Planning Authority;

"And whereas the Development Plan of Kalyan has been sanctioned by Government under Government Notification No.TPS 1279/3235(B)/UD-5, dated 16th January, 1980;

"And whereas the Government of Maharashtra has directed BMRDA to initiate modifications to the sanctioned Development Plan of Kalyan in respect of Site No.52 so as to exclude CTS Nos.2515(Pt) and 2516(Pt) of Kalyan owned by Shri A.V. Joshi from the reservation of "Open Space" under the provisions of Section 37 of MR&TP Act, 1966;

"Now, therefore, in exercise of the powers contained in Section 113(8) of MR&TP Act, 1966, BMRDA resolves to initiate minor modifications to the sanctioned Development Plan of Kalyan as indicated in Section 37 of MR&TP Act in respect of Site No.52.

"Resolved.....

"Resolved further that the Authority do in exercise of powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf, approve of a notice being published in the Maharashtra Government Gazette and in not less than two local newspapers inviting objections and suggestions from the public with respect to such modifications not later than one month from the date of such notice.

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act, read with Section 7(A) of the BMRDA Act, 1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses;

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government alongwith proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act."

Item No.5 : Preparation of Draft Development Plan for the area in Blocks III to VI of Backbay Reclamation - Declaration of intention to prepare the -

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.311 :

"Resolved that suitable corrigendum be issued to the BMRDA's Notification No.TCP(P-1)/DP-SPA(BBRS)/298, dated 11th March, 1985 published in Maharashtra Government Gazette, Konkan Division Supplement (Extraordinary) on 11th March, 1985 on page 50, so as to effect the deletion of reference to the "Backbay Beautification Scheme" in the Notification, as the Development Plan is to be prepared for the entire area within the jurisdiction of Special Planning Authority including 'Backbay Beautification Scheme' which would form part and parcel of the said Development Plan.

"Resolved.....

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to publish the said corrigendum in the Maharashtra Government Gazette and the newspapers as required under the MR&TP Act, 1966 and Rules thereunder."

**Item No.6 : Creation of two posts of Junior Architects.**

The Authority considered the Item Note and passed following Resolution :-

**RESOLUTION NO.312 :**

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the proposal to create two posts of Junior Architects, in the pay-scale of Rs.600-1150 plus usual allowances as proposed in the Agenda Note."

**Item No.7 : Creation of Marketing Cell in B.M.R.D.A.**

In connection with this item, the Metropolitan Commissioner pointed out that for the sake of uniformity the pay-scale of Assistant Marketing Managers should be Rs.600-1150 instead of Rs.680-1250 as stated in the Item Note. The Authority agreed with the Metropolitan Commissioner's suggestion and sanctioned the proposal with the above modification. The following Resolution was accordingly passed :-

**RESOLUTION NO.313 :**

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby accords its sanction to -

1) the designation of the post of Project Officer (Marketing) being changed to Marketing Manager and to continue the said post on a long term basis;

and

2) create two posts of Assistant Marketing Manager in the grade of Rs.600-1150 plus usual allowances etc., on a long term basis, as proposed."

Item No.8 : .....

17



**Item No.8 :** Payment of Rs.1/- lakh to the Association of Metropolitan Development Authorities by way of contribution for purchase of land for Association's Building.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

**RESOLUTION NO.314 :**

"Resolved that after due consideration of the request of the Chairman, AMDA, the Authority hereby approves the proposal to contribute Rs.1/- lakh towards purchase of land in New Delhi for constructing AMDA's own building. The expenditure should be met from the savings anticipated in the budget of 1986-87.

"Resolved further that the Authority empowers the Metropolitan Commissioner to make the payment of Rs.1/- lakh to the Association of Metropolitan Development Authorities (AMDA)."

**Any other item with the permission of the Chair :**

At this stage, Smt. Indumati Patel stated that Bombay Municipal Corporation had reserved about 5 acres of land at Oshiware for Muslim Cemetery. Accordingly the land was acquired by Municipal Corporation of Greater Bombay and the same is in its possession. The BMRDA has thereafter come forward with the proposal to acquire 3½ acres of land out of the said land for rehabilitation of structures presently situated on core-commercial land of the Oshiware District Centre. She further stated that the demand for the Muslim Cemetery is long standing one and the entire land acquired by the Bombay Municipal Corporation was required for the purpose. She suggested that the BMRDA should not acquire this land. The Metropolitan Commissioner agreed to examine the matter in consultation with Bombay Municipal Corporation.

The Meeting then concluded with vote of thanks to the Chair.

ukd:3686: